**“सारथी”**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड**

**सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**विभागाशी संबधित वारंवार विचारले जाणारे प्रश्न (F.A.Q.)**

| अ.क्र | प्रश्न | उत्तर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | **दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र मिळणे संबधी तसेच नावात सुधारणा करणे बाबत.** | विभागात शासनाव्दारे अंतिम मान्यता प्राप्त यादी असुन सदर यादीतील कुटंब सदस्यासह कुटुंब प्रमुखाचे नावे दारिद्रय रेषा क्रमांक असणारे प्रमाणपत्र वितरीत केले जाते. नविन प्रमाणपत्र अथवा नावात सुधारणा यासाठी विहीत नमुन्यात अर्ज, शपथपत्र, रहीवाशी व ओळख पुरावा यासाठी आवश्यक कागदपत्रे जोडावी लागतात. | प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी 07 दिवसांचा कालावधी असुन प्रमाणपत्र विनामुल्य दिले जाते |
| 2 | **स्वयंरोजगार कर्ज प्रस्ताव कसे तयार करावेत तसेच प्रस्ताव कधी स्विकारणार.** | शासनाकडुन प्राप्त होणा-या आर्थिक व भौतीक उदिष्टांच्या अनुषंगाने दारिद्रय रेषेखालील पात्र लाभार्थ्यांकडुन दोन प्रतिंमध्ये अर्जासहफोटो ,मतदान ओळखपत्र, राशन कार्ड, लाईटबील दारिद्रय रेषा प्रमाणपत्र,थकबाकीदार नसल्याबाबत शपथपत्र, कोटेशन यासह अर्ज मागवून प्रभाग निहाय बॅंकेस पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित केले जातात | शासनाकडुन उदिष्टये प्राप्त झाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देवुन अर्ज मागविण्यात येतात |
| 3 | **प्रशिक्षण घाटकाअंतर्गत विविध कौशल्यपूर्ण प्रशिक्षणाचे अर्ज कधी व कोणामार्फत स्विकारले जाणार** | शासना कडुन सुजयो विभागात आर्थिक व भैातिक उदिष्टये प्राप्त झाल्यांनंतर फोटो शैक्षणिक अर्हता कागदपत्रेदा.रे.प्रमाणपत्र नगरसेवक ओळखपत्र व अन्य आवश्यक कागदपत्रासह पात्र लाभार्थ्यांचे अर्ज स्किारण्यात येतात व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यातजातो. | सदर कामासाठी लोकशिक्षण प्रसारक मंडळ जालना कॅंम्प नांदेड ही संस्था केंद्रक संस्था (नोडल एजन्सी) म्हणुनमा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे आदेशान्वये नियुक्त असुन त्यांचे मार्फत अंमलबजावणी केली जाते |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | **महिला बचत गटांना फिरता निधी मिळणे संबधीची कार्यवाही कागदपत्रे व कालावधी** | महिला बचत गटाची स्थापना झाल्यानंतर नियमानुसार एक वर्षाचा कालावधी पूर्ण झालेल्या गटास जेष्ठता क्रमाने प्रतिमहिला सदस्य रु. 2000/- या प्रमाणे जास्तीत जास्त रु. 25000/- फिरता निधी मंजुर करता येतो. यासाठी पासबुक, फोटो, गटाचा मुळ ठराव व अन्य आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव विभागात सादर केल्यानंतर छाननी अंति प्राप्त उदिष्टांच्या अनुषंगाने उपलब्ध निधी नुसार फिरता निधी मंजुर करून वाटप करण्यात येतो | कालावधी निश्चित नसुन शासन उदिष्टये तसेच निधीची उपलब्धता व जेष्ठता क्रमाने फिरता निधी वाटप केला जातो |
| 5 | **महिला बचत गटांना उदयोग व्यवसायासाठी कर्ज प्रस्ताव कसा करावा, कागदपत्रे व स्वीकृती कधी** | महिला बचत गटांना फिरता निधी प्राप्त झाल्यानंरच गटाचे उदयोग गटात रुपांतर करता येते साधारणपणे परिसराचा अंदाज घेवून व गटातील सदस्या सहज पणे करू शकतील असा व्यवसाय निवडण्यासंबधी विभागाकडुन मार्गदर्शन करण्यात येते. प्रस्ताव तयार करण्यासाठी गटातील सर्व सदस्यांचेफोटो,मतदान ओळखपत्र/ आधारकार्ड, राशनकार्ड, दारिद्रय रेषा प्रमाणपत्र, प्रकल्प अहवाल,कोटेशन इ.सह दोन प्रतित प्रस्ताव मागविले जातात.छाननीअंतिगटांचे मुल्यांकन समुह संघटक करतात पात्र गटांचे प्रस्ताव बँकेत मंजुरीस्तव अग्रेषित केले जातात वरील कार्यवाही शासनाकडुन उदिष्टये आल्यानंतर करण्यात येते. | |

**संपर्कासाठी क्र. सहाय्यक आयुक्त 9011001018** **स्वाक्षरीत/**

**सहाय्यक आयुक्त तथा सप्रअ.**
सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना,
नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड.